# अमरावतीच्या तरुणाला एनआयए ने घेतले ताब्यात

## जैश-ए-मोहम्मदशी संपर्कात असल्याच्या संशय

**महासागर प्रतिनिधी**

**अमरावती( दि.12 )-** राष्ट्रीय तपास यंत्रणेने (एनआयए) अमरावतीच्या छाया नगर परिसरात छापेमारी करून 26 वर्षीय तरुण मोहम्मद युनूस शेख याला ताब्यात घेतले. एनआयए ने त्याला येथील राजापेठ पोलीस ठाण्यात नेत चौकशी आरंभिली आहे. पाकिस्तान येथील दहशदवादी संघटना जैश-ए-मोहम्मद शी त्याचा संबंध असल्याच्या संशयावरून ही चौकशी केल्या जात आहे.




एनआयएचे पथक गुरुवारी पहाटेच अमरावतीत दाखल झाले होते. त्यांनी अमरावती शहरातील छाया नगर परिसरात राहणाऱ्या एका युवकाला पाकिस्तानच्या जैश-ए-मोहम्मद संघटनेशी संबंध असल्याच्या माहितीवरून ताब्यात घेतले. एनआयएचे पथक आणि राजापेठ पोलिसांच्या वतीने संयुक्त ही कारवाई करण्यात आली.

या युवकाला राजापेठ पोलिस ठाण्यात नेण्यात आले. तेथे दिवसभर त्या तरुणाची चौकशी एनआयएच्या अधिकाऱ्यांकडून सुरु होती. छाया नगर परिसरातील 35 वर्ष युवक गत काही दिवसांपासून पाकिस्तानमधील काही संघटनांसोबत सोशल मीडियाच्या माध्यमातून संपर्कात होता काय? या युवकाचा नेमका कोणत्या संघटनांशी संपर्क होता? या संदर्भात एनआयएचं पथक चौकशी करत आहे.

### 2022 मध्ये आलं होतं एनआयएचं पथक

यापूर्वी अमरावती शहरात एनआयएचं पथक 2022 मध्ये उमेश कोल्हेंच्या हत्या प्रकरणाच्या चौकशीसाठी आले होते. आता पुन्हा एकदा एनआयएचे पथक अमरावतीत दाखल झाले. चौकशीसाठी ताब्यात घेण्यात आलेल्या युवकाची बराच वेळेपासून चौकशी सुरू आहे. या प्रकरणात नेमकं काय तथ्य आहे? हे अद्याप स्पष्ट झाले नाही. गेल्या वर्षी अचलपूरातील अकबरी चौक परिसरातून एकाला ताब्यात घेण्यात आले होते.

### अमरावती, संभाजी नगर आणि भिवंडीत एनआयएची छापेमारी

राष्ट्रीय तपास यंत्रणेकडून 19 ठिकाणी छापेमारी करण्यात आली. त्यात अमरावती, संभाजी नगर आणि भिवंडीतील तीन संशयित आरोपींना ताब्यात घेण्यात आले आहे. पाकिस्तानची दहशदवादी यंत्रणा जैश - ए- मोहम्मद या संस्थेशी त्यांचे संबंध असल्याच्या संशयावरून या तरुणांना ताब्यात घेण्यात आले आहे. गेल्या सहा महिन्यांपासून हे तरुण जैश - ए- मोहम्मद या दहशदवादी संघटनेशी संपर्कात असल्याची माहिती आहे. देशात महाराष्ट्रासह उत्तर प्रदेश आणि जम्मू आणि कश्मीर केंद्रशासित प्रदेशात देखील छापेमारी करण्यात आली. तरुणांना कट्टरपंथी बनवण्याचा आणि भारतात दहशत पसरवण्याचा जैश - ए- मोहम्मद संघटनेचा कट असल्याचे अधिकाऱ्यांनी सांगितले.

# शहरात चायना मांजा विक्रीच्या तीन ठिकाणावर धाडी

## मांजा विक्रेत्यांविरुध्द गुन्हा दाखल

*महासागर प्रतिनिधी*

*अमरावती( दि.12 )- प्रतिबंधित नायलॉन मांजा विक्री प्रतिष्ठानावर पोलिसांनी धाडसत्र राबवून मोठ्या प्रमाणात नायलॉन मांजा जप्त केला आहे. याप्रकरणात पोलिसांनी मांजा विक्रेत्याला ताब्यात घेऊन, त्याच्याजवळील नायलॉन मांजा जप्त केला आहे. शहरात पतंगबाजीला सुरुवात, या मथळ्याखाली नवराष्ट्रने वृत्त प्रकाशीत केले होते. या वृत्ताची दखल घेऊन पोलिस आयुक्त नवीनचंद्र रेड्डी यांनी तत्काळ चायना नायलॉन मांज्यावर प्रतिबंधाबाबत आदेश पारित केले. त्यानंतर पोलिस विभागाकडून नायलॉन मांज्याविरुध्द कारवाया सुरु झाल्या.*



### नायलॉन मांज्याची वाहतुक करताना पकडले

पोलीस आयुक्त नविनचंद्र रेड्डी यांनी प्रतिबंधीत चायना मांजावर कारवाई करण्याबाबत निर्देशीत केले होते. त्या अनुषंगाने गुन्हे शाखा युनिट क्रमांक 2 यांचे पेट्रोलींग करीत असतांना पोलिसांना गुप्त माहीती मिळाल्या की, ट्रान्सपोर्ट नगरातील अब्दूला हॉल येथे एक इसम सायकलवर पृष्ठाच्या खोक्यामध्ये प्रतिबधीत चायना मांजाची विक्री करण्याकरीता उभा आहे. या माहीतीवरून एपीआय महेश इंगोले व त्यांच्या पथकाने अब्दूला हॉल येथे जाऊन सदर इसमाला ताब्यात घेतले. त्याने त्याचे नाव इजाजुददीन सैफुददीन (45, रा. हबीब नगर नं.2) असे सांगीतले. पोलिसांनी आरोपीच्या ताब्यातून 43 नग वेगवेगळ्या कंपन्याचे चायना मांजाचे चक्रे, मोटार सायकल, एक मोबाईल व रोख असा एकूण 70 हजार रुपयांचा मुददेमाल जप्त केला. आरोपीविरूध्द गाडगेनगर पोलिस ठाण्यात गुन्हा नोंदविण्यात आला आहे.

### बडनेरातही चायना मांजा विक्रेत्यावर कारवाई

बडनेरा पोलिसांनीही अब्दुल अहील अब्दुल कादिर (वय 58 वर्ष) याच्या ताब्यातून प्रतिबंधीत नायलॉन मांजा जप्त केला. त्याने हा मांजा कोठून आणला, याबाबत पोलिस चौकशी करीत आहेत. सदरची कारवाई पोलिस आयुक्त यांच्या मार्गदर्शनात बडनेरा पोलिस ठाण्यातील डीबी पथकाने केली.

### अकोला येथुन चायना मांजा आणून विक्री करणारा जेरबंद

फ्रेजरपुरा पोलीसांनी गोपनीय माहीतीवरून एका संशयीतास ताब्यात घेतले असता, त्याच्याजवळ 12 नायलॉन मांजाच्या चक्री आढळून आल्या. पोलिसांनी 12 हजार 500 रुपये किमंतीचा मुददेमाल जप्त केला असून, आरोपीविरुध्द फ्रेजरपुरा पोलिस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला आहे. सदर गुन्ह्याच्या पुढील तपासात सदर नायलॉन मांजाचा मुळचे स्त्रोताचा शोध घेण्यासाठी पोलिस अकोला येथे गेले. पोलिसांनी तेथील नायलॉन मांजाची विक्री करणारा संशयीत इसम विशाल संतोष वरोकार (वय 23 वर्षे, रा. मोठी उमरी, अकोला) यास ताब्यात घेतले. त्याच्याकडून नायलॉन मांजाचा 60 हजार रुपये कीमतीच्या 60 चक्रीचा एक बॉक्स जप्त केला आहे.

# घरफोडी करणारे प्रेमी युगल पोलिसांच्या जाळ्यात

## स्थानिक गुन्हे शाखेची कार्यवाही

**महासागर प्रतिनिधी**

**अमरावती (दि.12 )-** घरफोडी करणारे प्रेमीयुगुल पोलिसांच्या जाळ्यात अडकल्याने खळबळ उडाली आहे. रोहन राजेंद्र वानखडे (वय 23 वर्ष रा. आझाद नगर, परतवाडा) व एक युवती असे अटक आरोपीचे नाव असून, त्याचा साथीदार आरोपी प्रणय रघुनाथ बादशे (रा. बेगमपुरा, अचलपुर) हा फरार झाला आहे.



30 नोव्हेबर रोजी सुधा गिरीष तिवारी (वय 63 वर्ष रा. महाविर चौक, परतवाडा) यांनी परतवाडा ठाण्यात तक्रार दिली होती कि, त्या 29 नोव्हेबर रोजी रात्री दरम्यान घराच्या वरील मजल्यावर असलेल्या रुममध्ये झोपायला गेल्या असता खालील रुमच्या कपाटातील 60 हजाराची रोख तसेच एक सिलेन्डर व इतर साहित्य असे एकुण 63 हजार 950 रुपयाचा मुददेमाल कोणीतरी अज्ञात चोराने कुलूप उघडुन चोरुन नेला. या तक्रारीवरुन परतवाडा पोलिस ठाण्यात आरोपीविरुध्द गुन्हा नोंद करण्यात आहे. या गुन्हाच्या अनुषगांने 10 डिसेबर रोजी स्थानिक गुन्हे शाखेच्या पथकाला मिळालेल्या गोपनिय माहीतीवरुन त्यांनी रोहन राजेंद्र वानखडेला ताब्यात घेतले. पोलिसांनी त्याची चौकशी केली असता, त्याने सदर गुन्हयाबाबत कबुली दिली. आरोपी रोहन वानखडे यांचे अंजनगाव सुर्जी येथील गणेशनगर एका युवती सोबत प्रेमसंबध असुन ती युवती फिर्यादी सुधा तिवारी यांचे घरी वरचे मजल्यावर भाडेतत्वावर राहत होती. 29 नोव्हेबर रोजी रात्री फिर्यादी सुधा तिवारी या घराच्या वरील मजल्यावर झोपल्या असता खाली घरात कोणीच नसल्याचे पाहुन भाडेतत्वावर राहणा-या युवतीने तिचा प्रियकर रोहन वानखडे यास फोन करुन बोलाविले आणि त्यानंतर घरी चोरी करण्याचा कट रचुन घराचा दरवाजा उघडा ठेवला. त्याप्रमाणे रोहन वानखडे याने त्याचा साथीदार प्रणय रघुनाथ बादशे याला स्वता:च्या मोटर सायकलवर बसुन सुधा तिवारी यांचे घरुन सिलेन्डर व इतर सामान चोरुन आणले. सदर आरोपी रोहन वानखडे व त्याची प्रियकर यांना ताब्यात घेवुन चोरलेल्या मुददेमालाबाबत विचारणा केली असता त्यांनी सांगितले कि, चोरलेल्या पैसेतुन लॅपटॉप खरेदी केले असुन सिलेन्डर रोहन वानखडे याचे घरी ठेवले आहे. या माहितीवरून पोलिसांनी आरोपींकडुन लॅपटॉप, सिलेन्डर व गुन्हयात वापरलेली हिरो स्पेल्डर मोटर साकयल असा एकुण 86 हजार रुपयाचा मुददेमाल जप्त करण्यात आला. पुढील तपास परतवाडा करीत आहे.



# राज्य महामार्गावर लिकेजमुळे पाण्याचा अपव्यय

## दोन-तीन वर्षापासून वाहनधारकांना त्रास

**महासागर प्रतिनिधी**

**मोर्शी,( दि.12 ) –** मोर्शी ते आष्टी रोडवर मोर्शी पासून जवळ तीन किलोमीटर अंतरावर झिरो पॉईंट जवळ पाणीपुरवठा योजनेच्या पाईपलाईन च्या लिकेज मधून गेल्या दोन-तीन वर्षापासून दररोज लाखो लीटर पाणी वाया जात आहे. मोर्शी ते आष्टी या राज्य महामार्गावरून वाहत असणाऱ्या या पाण्यामुळे वाहनधारकांना खूप त्रास सहन करावा लागत आहे. पाणी पुरवठा योजनेच्या अधिकाऱ्यांना तसेच या मार्गाची देखभाल करणाऱ्या सार्वजनिक बांधकाम विभागाच्या अधिकाऱ्यांना सुद्धा याबाबतची जाणीव असून देखील या गंभीर बाबीकडे लक्ष देण्यास कुणीही तयार नाहीत. याच मार्गावर खुले कारागृह आहे. राज्य महामार्ग असल्याने या मार्गावरून मोर्शी ते वर्धा एसटी गाड्या धावतात तसेच नलदमयंती सागर असल्यामुळे पर्यटकांचीही या रस्त्याने खूप वर्दळ असते. या लिकेच्या अव्याहतपणे रस्त्यावरून वाहणाऱ्या पाण्यामुळे सर्व वाहनधारकांना त्रास होतो तरी याकडे कुणाचे लक्ष नाही. त्यामुळे सर्वत्र आश्चर्य व्यक्त केल्या जात आहे.

# घरफोडीतील कुख्यात चाळीसगावातून अटक

## गुन्हे शाखेच्या पथकाची कारवाई

**महासागर प्रतिनिधी**

**अमरावती,( दि.12 )-** अमरावती शहरासह संभाजीनगर जळगाव व महाराष्ट्रामधील इतर जिल्ह्यात घरफोडी करणार्या एका कुख्यात आरोपीला जळगावातील चाळीसगाव येथून अटक करण्यात आली. शेख मुखतार शेख मेहबुब उर्फ दाडया (रा. नुरानी नगर, पाचोरा, जि. जळगाव) असे आरोपीचे नाव असून, त्याच्या ताब्यातून मुद्देमाल जप्तीचे प्रयत्न पोलिस करीत आहे. गुन्हे शाखेच्या पथकाने 12 डिसेंबर रोजी ही कारवाई केली.



### आरोपीविरुध्द राज्यभरात गंभीर गुन्ह्यांची नोंद

सदर आरोपी हा घरफोडी व चोरी करण्याच्या सवईचा असुन त्याच्यावर संभाजीनगर, जळगाव, चाळीसगाव, पाचोरा, याठिकाणी जबरीचोरी, घरफोडी, चोरी प्राणघातक हत्यार चा वापर करुन जबरी चोरी करणे अशाप्रकारचे गंभीर स्वरुपाचे गुन्हे दाखल आहे. सदर आरोपीकडुन अमरावती शहरातील इतर बरेच घरफोडी चोरीचे गुन्हे उघड होण्याची शक्यता आहे.

अमरावती शहर आयुक्तालय हद्दीत मागील काही महीन्यापासून राजापेठ व बडनेरा हद्दीत घरफोडी, चोरीचे प्रयत्न व चोरी होत असल्याचे निदर्शानात आले आहे. दरम्यान पोलीस आयुक्त नविनचंद्र रेड्डी यांनी हे गुन्हे उघडकीस आणण्याबाबत आदेशीत केले होते. या अनुषंगाने गुन्हे शाखेकडून राजापेठ ठाण्यातील एका गुन्ह्याचा समांतर तपास करीत होते. दरम्यान पोलिसांनी गुप्त माहीतीवरून तसेच तांत्रीक पध्दतीने तपास केला असता सदरचा गुन्हा हा महाराष्ट्रात विविध जिल्ह्यात घरफोडी करणारा कुख्यात आरोपी शेख मुखतार शेख मेहबुब उर्फे दाडया याने केल्याचे निष्पन्न झाले. यावरून पोलिसांनी 10 डिसेंबर रोजी चाळीसगाव येथून आरोपीला ताब्यात घेतले. पोलिसांनी त्याची चौकशी केली असता, त्याने गुन्हा केल्याची कबूली दिली. तसेच अमरावती शहरात इतरही काही ठिकाणी घरफोडी केल्याची कबुली दिली. आरोपीला पुढील तपास कामी चाळीसगाव शहर येथुन ताब्यात घेण्यात आले असून, त्याला राजापेठ पोलिसांच्या ताब्यात देण्यात आले.

# सेंद्रीय शेतीचा नारा फोल, रासायनिकचा मोह सुटेना!

## पशुधन घटल्याने सेंद्रीय खतांचा तुटवडा ■ रासायनिक खतांच्या वारेमाप वापरामुळे सुपीकता धोक्यात



**नितीन दुर्बुडे**

**पथ्रोट,( दि.12 ) –** रासायनिक खतांच्या अंदाधुंद वापराचे धोके लक्षात घेता, गेल्या दोन दशकांपासून देशभरासह राज्यात सेंद्रिय शेतीचा नारा दिला जात आहे. गेल्या सहा-सात वर्षापासून सरकारही याबाबत गंभीर असल्याचे दिसून येत आहे. मात्र सातत्याने रासायनिक खतांची वाढती मागणी लक्षात घेता शासनाच्या या घोषणा फोल ठरताना दिसून येत आहेत. दुसरीकडे पशुधन सातत्याने घटत असल्याने सेंद्रीय खतांचा तुटवडा निर्माण होत असून रासायनिक खतांचा वापर वारेमाप सुरुच आहे. परिणामी जमिनीची सुपिकता सातत्याने नष्ट होत आहे.

दोन दशकांपूर्वी बहुतांश शेतकरी नैसर्गिक शेती, सेंद्रीय शेती कसायचे. परंतु आता रासायनिक खतांचा वापर करुनच शेतकरी शेती कसताना दिसून येत आहे. शेती क्षेत्रातील मजुरी, कृषीनिविष्ठा, रासायनिक खते, कीटकनाशकांच्या किमती वाढल्याने शेतीही महागडी ठरत आहे. सद्यस्थितीत तालुक्यात सेंद्रिय शेती करणारे मोजकेच शेतकरी दृष्टीस पडतात.

सेंद्रिय शेती परवडणारी नाही. शेणखताचा तुटवडा, सेंद्रिय खतांची अनुपलब्धता आदी कारणांमुळे ही शेती सर्वांनाच कसणे शक्य नाही. शेणखत, कंपोस्ट खत, हिरवळीची खते, गांडूळ खत, माशांचे खत, कत्तलखान्यातील खत आदींचा सेंद्रिय खतांमध्ये समावेश होतो.

### मातीचे संवर्धन अत्यंत गरजेचे

जमिनीची धूप झाल्याने झाडांच्या मुळांचा आधार निघून गेला आहे. त्याचा परिणाम जमिनीची सुपीकता कमी होण्यात झाला आणि त्याचा परिणाम म्हणून कृषी उत्पादकतेत घट होऊ लागली. एक इंच मातीचा थर निर्माण करण्यास निसर्गाला बरीच वर्षे लागतात. त्यामुळे मातीचे संरक्षण आणि संवर्धन करणे अत्यंत गरजेचे असल्याचे तज्ज्ञांद्वारे सांगितल्या जाते.

### तालुक्यातील काही भागात नैसर्गिक शेती

तालुक्यात सेंद्रिय शेती मोजकेच शेतकरी कसतात. अनेक शेतकरी नैसर्गिक शेती करीत आले आहेत. या शेतीत कोणत्याही रासायनिक खतांचा वापर केला जात नाही. खरीप हंगामात धान्याची पेरणी केल्यानंतर त्याची केवळ देखभाल, निंदण करणे, पाणी व्यवस्थापन करणे आदी बाबींवरच येथील शेतकरी लक्ष देत आले आहेत.

### सेंद्रिय उत्पादित अन्न विषमुक्त

आधुनिक तंत्रज्ञानाचा वापर तसेच नवीन कृषी निविष्ठा वापरल्याने शेतकरी अधिकाधिक उत्पादन घेऊ शकतो. परंतु सेंद्रिय शेतीच्या भरवशावर शेतकरी राहिल्यास शेतातील उत्पन्न 30 ते 40 टक्के घटण्याची शक्यता असते. असे असले तरी सेंद्रिय शेतीमुळे जमिनीचा पोत व सुपीकता टिकून राहते. पाणी धरण्याची क्षमता अधिक राहून पिकाची वाढही जोमदार होते. तसेच सेंद्रीय उत्पादित अन्न विषमुक्त असते.


**महाराष्ट्र शासन**

**वरिष्ठ भूवैज्ञानिक यांचे कार्यालय**

**भूजल सर्वेक्षण आणि विकास यंत्रणा**

**भू.स.वि.यं.कर्मशाळा, तपोवन रोड, अमरावती- ४४४६०२**

**दुरध्वनी क्र. ( ०७२१ )२५५१४५०, २५५१४४९ ई-मेल क्र. Sg_amravati@rediffmail.com**

सन २०२४-२०२५ करिता जलयुक्त शिवार अभियान २.० अंतर्गत करण्याकरीता अमरावती जिल्हातील समाविष्ट तालुक्यातील समाविष्ट गावामध्ये एकूण प्रस्तावित ३५ गावामध्ये ४४४ रिचार्ज शाफ्ट कृत्रिम पूनर्भरणाच्या उपाययोजनाची कामे करणेकरीता अनुभवी कंत्राटदारांची नोंदणी (Empanelment) करून कामे वाटप करणेकरीता जाहीर ई-निविदा प्रसिद्ध करण्यात येत आहे. ह्या निविदेविषयी सविस्तर माहिती http://mahatenders.gov.in या संकेतस्थळावर उपलब्ध आहे.

| | | |
|---|---|---|
| १) | ई-निविदा क्र. | ०१/२०२४-२५ |
| २) | ई-निविदा आयडी | 2024_DGSSA_1121955_1 |
| ३) | ई-निविदा विक्री | दिनांक ०९.१२.२०२४ सकाळी ०१.०० वा. ते दिनांक ३१.१२.२०२४ सायंकाळी ०५.०० वाजेपर्यंत |
| ४) | ई-निविदापूर्व बैठक | दिनांक १३.१२.२०२४ दुपारी १२.०० वाजता |
| ५) | ई-निविदा सादर करणे | दिनांक ०९.१२.२०२४ सकाळी १०.०० वा. ते दिनांक ३१.१२.२०२४ सायंकाळी ०५.०० वाजेपर्यंत |
| ६) | ई-निविदा उघडणे | दिनांक ०९.१२.२०२४ सकाळी १०.०० वा. |

**( राजेश सावळे )**

**वरिष्ठ भूवैज्ञानिक**

**भूजल सर्वेक्षण आणि विकास यंत्रणा अमरावती**

**विमाका/अम./जाही./८४६/२०२४-२०२५**


आरएनआय ४६९७५/१९८५ महासागर अमरावती

मालक, मुद्रक, प्रकाशक श्रीकृष्ण तनसुखदास चांडक यांनी अरूणोदय प्रेस, कॉटन मार्केट, नागपूर १८ येथे छापून दैनिक महासागर कार्यालय, होटल टूरिस्टच्या बाजूला रेल्वे स्टेशन चौक, अमरावती येथे प्रकाशित केले. संपादक -श्रीकृष्ण तनसुखदास चांडक ( पीआरबी कायद्यानुसार संपादकीय जबाबदारी यांच्यावर राहील ) अमरावती मुख्य कार्यालय, पत्ता. दैनिक महासागर, होटल टूरिस्टच्या बाजूला रेल्वे स्टेशन चौक अमरावती, फोन नं. ९५१८९३४५०४

# मोर्शी-आष्टी मार्गावरील पुलाचे संरक्षक कठडे गायब

## वाहन चालकांसाठी झाला धोकादायक

**महासागर प्रतिनिधी**

**मोर्शी,( दि.12 )** - दरवर्षी पावसाळ्यामध्ये अप्पर वर्धा धरणातून नदीत पाणी सोडल्यानंतर पाण्याखाली जाणारा पहिला पूल अशी मोर्शी-आष्टी मार्गावरील सिंभोरा धरणानजीकच्या पुलाची ओळख आहे. गेल्या काही वर्षांपासून हा पूल प्रत्येक पावसाळ्यामध्ये पाण्याखाली जातो. या पुलावर नागरिकांच्या तसेच वाहनचालकांच्या सुरक्षिततेसाठी सार्वजनिक बांधकाम विभागाच्या वतीने बसवलेले संरक्षक कठडे गेल्या काही महिन्यांपासून गायब झाले आहेत. त्यामुळे या पुलावरून ये-जा करणाऱ्या नागरिकांची सुरक्षितता धोक्यात आली आहे.

अमरावती आणि वर्धा जिल्ह्याला जोडणारा हा मोर्शी-आष्टी रस्त्यावरील वाहतुकीसाठी या पुलाचा वापर केला जातो. अप्पर वर्धा धरण पाहण्यासाठी येणाऱ्या लहान मुले, ज्येष्ठ नागरिक यांच्याकडून देखील या पुलाचा वापर केला जातो. नागरिकांना सुरक्षितपणे चालता यावे यासाठी या पुलाच्या दोन्ही बाजूला संरक्षक कठडे बसविण्यात आले होते. पण सध्या हे कठडेच नसल्याने नागरिकांची सुरक्षितता धोक्यात आली आहे. पावसाळ्यात या पुलावरून पाणी वाहण्यास सुरुवात होण्याआधी खबरदारीचा उपाय म्हणून सार्वजनिक बांधकाम विभाग प्रशासन या पुलाला बसविण्यात आलेले लोखंडी संरक्षक कठडे काढून ठेवते. पण आता डिसेंबर महिना सुरू झाल्यानंतरही हे संरक्षक कठडे लावण्यात आलेले नाहीत. त्यामुळे वाहन चालक व पादचारी यांच्यावर कोणत्याही वेळेस अनुचित प्रकार घडून जीवितहानी होऊ शकते.



# परभणीमध्ये घडलेल्या घटनेचा वरुड तालुक्यात जाहीर निषेध

- त्या समाजकंटकावर देशद्रोहाचा गुन्हा दाखल करण्याची मागणी
- विविध संघटनांनी दिले तहसीलदारांना निवेदन

**महासागर प्रतिनिधी**

**वरुड,( दि.12 )** - परभणी येथील भारतरत्न डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या पुतळ्यासमोरील राज्यघटनेच्या प्रतिकात्मक प्रतिकृतीचा एका समाजकंटकाने अवमान केल्याच्या घटनेनंतर परभणी शहरात संतापाची लाट उसळली. या घटनेच्या निषेधार्थ पुकारलेल्या परभणी बंदला बुधवारी (दि.11) हिंसक वळण आले. दगडफेक, जाळपोळ, तोडफोडीच्या घटना घडल्या. पोलिसांना सौम्य लाठीमार करून जमाव पांगवा लागला. शहरात दिवसभर तणावपूर्ण स्थिती होती. सायंकाळी स्थिती नियंत्रणात आली. शहरात ठीकठिकाणी पोलीस बंदोबस्त तैनात असून विविध पातळ्यावरून शांततेचे आवाहन केले जात होते. अशातच वरुड शहरात शांततेच्या मार्गाने संबंधित घटनेच्या निषेधार्थ विविध संघटनांनी पुढाकार घेऊन नायब तहसीलदार पंकज चव्हाण यांना निवेदन देऊन त्या संबंधितावर देशद्रोहाचा गुन्हा दाखल करा, अशी मागणी करून त्याचा निषेध करण्यात आला. परभणी येथील पोलीस स्टेशन रोड भागातील जिल्हाधिकारी कार्यालयासमोर डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांचा पुतळा आहे. तेथे संविधानाची सिमेंट पासून बनवलेली प्रतिकृती असून तिला काचेचे आवरण आहे. एका समाजकंटकाने मंगळवारी (ता. 10) सायंकाळी प्रतिकृतीवरची काच फोडली. त्यानंतर तेथे जमलेल्या जमावाने त्याला चोप दिला होता. पोलिसांनी त्याला ताब्यात घेतले. या घटनेचे पडसाद वरुड तालुक्यात सुद्धा उमटले. गुरुवार (दि.12) ला दुपारी 1 वाजताच्या दरम्यान भारतीय बौद्ध महासभा, राष्ट्रवादी काँग्रेस पक्ष, आक्रोश जनशक्ती संघटना, बहुजन समाज पार्टी अशा विविध संघटनांनी एकत्रित येऊन नायब तहसीलदार पंकज चव्हाण यांना लेखी निवेदन देऊन त्या समाजकंटकावर देशद्रोहाचा गुन्हा दाखल करून त्याच्यावर कारवाही करा अशा मागणीचे निवेदन दिले. यावेळी राष्ट्रवादी काँग्रेस पक्षाचे गिरीश कराळे, आक्रोश जनशक्ती संघटनेचे सुशील बेले, बहुजन समाज पार्टीचे कमल नारायण उईके, भारतीय बौद्ध महासभेचे अरविंद गजभिये, गोपाल पाटील, महेंद्र हरले, मनोज लांडगे, विनोद ठवरे, अजय चौधरी, राजन सोनुले ,अमोल वाहने, सोपान ढोले, रत्ना ढोले, प्रज्ञा बोडखे, योगेश नागलेसह शेकडो कार्यकर्ते उपस्थित होते.



# उद्यापासून साजरा होणार ऊर्जा संवर्धन सप्ताह

**विद्यार्थ्यांद्वारे जनजागृती कार्यक्रम**

**महासागर प्रतिनिधी**

**अमरावती,( दि.12 )** - राष्ट्रीय ऊर्जा संवर्धन सप्ताह शनिवार, दि.14 ते 20 डिसेंबर, 2024 दरम्यान राबविण्यात येणार आहे. या सप्ताहात विद्यार्थ्यांमार्फत ऊर्जा संकट व अपारंपरिक ऊर्जा स्त्रोतांचा वापराविषयी जनजागृती करण्यात येणार आहे. नवीन व नवीकरणीय ऊर्जा, तसेच ऊर्जा बचतीचे महत्त्व वाढत आहे. आज 60 टक्क्यांपेक्षा जास्त ऊर्जा निर्मिती ही औष्णिक ऊर्जा निर्मिती पद्धतीने केली जाते. तथापि पारंपरिक पद्धतीने ऊर्जा निर्मिती करताना पर्यावरणामध्ये ग्रीन हाऊस गॅसेस सोडले जातात. यामध्ये कार्बन, क्लोराईड, नॉयट्रोजन, सल्फेट यांचा समावेश असतो. या वायूचा पर्यावरणावर विपरीत परिणाम होत आहे. तसेच जागतिक उष्णतामान वाढत आहे. पारंपरिक ऊर्जा निर्मितीचे स्त्रोत सिमीत आहे. राष्ट्रीय ऊर्जा संवर्धन सप्ताहामध्ये शाळा व महाविद्यालयाच्या विद्यार्थ्यांमार्फत ऊर्जा संकटाबाबत जनतेमध्ये जनजागृती, तसेच अपारंपरिक ऊर्जा स्त्रोतांचा वापराविषयी प्रबोधनात्मक संदेश लोकांपर्यंत पोहोचविण्यात येणार आहे.

## निवृत्ती वेतनधारकांनी 20 डिसेंबरपर्यंत

**अमरावती**- सर्व निवृत्ती वेतनधारक, कुटुंब निवृत्तीवेतनधारकांनी दि. 20 डिसेंबरपर्यंत ह्यातीचे प्रमाणपत्र सादर करावेत, असे आवाहन करण्यात आले आहे. निवृत्तीवेतन धारकांना आपले ह्यातीचे प्रमाणपत्र विहित मुदतीत बँकेत जाऊन सादर करावे, विहित कालावधीत ज्या निवृत्तीवेतनधाराकांनी सादर केले नाहीत, त्यांनी ह्यात प्रमाणपत्र तयार करून त्यावर सक्षम अधिकारी यांची स्वाक्षरी घेऊन दि. 20 डिसेंबरपर्यंत अमरावती कोषागार कार्यालयात सादर करावेत, सदर कालावधीत ह्यात प्रमाणपत्राची कार्यवाही केली नसल्यास निवृत्तीवेतनाचे प्रदान होणार नाही, असे आवाहन कोषागार अधिकारी अमोल ईखे यांनी केले आहे.

# 'निमा' ची वास्तू संपूर्ण समाजासाठी आदर्श ठरेल - प्रविण पोटे

**नवनियोजित वास्तूचा भूमिपूजन सोहळा**

**महासागर प्रतिनिधी**

**अमरावती,( दि.12 )** - निमा' (नॅशनल इंटिग्रेटेड मेडिकल असोसिएशन) अमरावती शाखा नवनियोजित वास्तूचा भूमिपूजन सोहळा मोठ्या उत्साहात माजी राज्यमंत्री आ.प्रविण पोटे पाटील यांच्या हस्ते पार पडला. याप्रसंगी कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी महाराष्ट्र कौन्सिल ऑफ इंडियन मेडिसिन चे माजी अध्यक्ष डॉ. दिनेश गवळी तर विशेष अतिथी म्हणून श्रेयस पोटे पाटील उपस्थित होते. धन्वंतरी पूजनाने कार्यक्रमाची सुरवात करण्यात आली.



निमाच्या कार्यातून केवळ वैद्यकीय क्षेत्रातच नव्हे, तर समाजाच्या सेवेतही योगदान देण्याचे आवाहन प्रविण पोटे पाटील यांनी केले तसेच भविष्यात निमाची वास्तू संपूर्ण समाजासाठी आदर्श ठरेल, असा विश्वास यावेळी प्रविण पोटे पाटील यांनी व्यक्त केला. यावेळी मंचावर निमा अध्यक्ष डॉ. प्रवीण औगड,निमा राज्य कार्यकारणीचे डॉ.दीपक पोच्ची, डॉ.स्वप्नील घाटोळ, निमा आयुर्वेद फोरमचे राज्याध्यक्ष डॉ.अमोल ढवळी, डॉ. कमल राऊत, डॉ.राजेश उताणे, निमा आयुर्वेद फोरमचे अध्यक्ष डॉ.उन्मेश डालके, निमा वुमन्स फोरमच्या अध्यक्षा डॉ.प्रेमा चौधरी, निमा सचिव डॉ.पंकज कावरे हे उपस्थित होते. या भूमिपूजन सोहळ्याला निमा माजी राज्यसचिव डॉ.अनिल बाजारे, डॉ.अजमिरे, डॉ.अजय डकरे, डॉ.विनोद रोडे, डॉ.अटल तिवारी, डॉ.विनोद मेहत्रे, डॉ.अनिल जावरकर, डॉ. मुरलीधर खारोडे, डॉ.सुरेश पोधाडे, डॉ.सुनील लांडे, डॉ. अजय गुडघे, डॉ.प्रमोद मराठे, डॉ.प्रिया चौधरी, डॉ.वर्षा रोडे, योजना बर्डे, डॉ.वैशाली ठवळी, डॉ.राम खरबडे, डॉ.राहुल माहुले, डॉ.विनोद फुसे, डॉ.तुषार पोहनकर, डॉ.संदीप पाठबागे, डॉ.आनंद उल्हे, डॉ.उज्वल बारंगे, डॉ.वैशाली बारंगे, डॉ.विपीन टोंगळे, डॉ.अमर बोडखे आणि डॉ.स्वाती टोंगळे, राम खरबडे यांच्यासह अनेक मान्यवर उपस्थित होते.




# रुग्णांसाठी रुग्णवाहिका ही सेवा अत्यंत महत्त्वाची -आ. अडसड

**8 रुग्णवाहिका रुग्णांच्या सेवेत**



**महासागर प्रतिनिधी**

**चांदूर रेल्वे, ( दि.12 )** - रुग्ण सेवा हीच ईश्वर सेवा हे बिद्र वाक्य लक्षात घेत व कोरोना काळात रुग्णवाहिका ची कमतरता व त्यामुळे रुग्णांचे झालेली असुविधा बघता धामणगाव विधानसभा मतदारसंघाचे आमदार प्रताप अडसड यांनी विशेष प्रयत्न करून राज्य शासनाकडून मतदार संघातील तिन्ही तालुक्यात करिता आठ रुग्णवाहिका रुग्णांच्या सेवेकरीता उपलब्ध करून दिल्या. त्याचा लोकार्पण सोहळा बुधवार रोजी ग्रामीण रुग्णालय चांदूर रेल्वे येथे थाटात पार पडले. यावेळी मंचावर आमदार प्रताप अडसड, तालुका वैद्यकीय अधिकारी प्रियंका निकोसे, विस्तार अधिकारी विधाते, तालुका आरोग्य अधिकारी माधुरी दुबे, डॉ. क्षिरसागर, डॉ. मालखेडे, पंचायत समिती सभापती प्रशांत भेंडे, भाजपा तालुकाध्यक्ष बबन गावंडे, शहराध्यक्ष बंडू भुते, हरिचंद्र खंडाळकर, मनोज डहाके, राजेश पाठक, सविता ठाकरे आदी मंचावर हजर होते.

रुग्णवाहिका ही रुग्णांच्या सेवेकरीता देण्यात आलेली आहे, या संदर्भात कोणी हयगय केल्यास ते खपवून घेतले जाणार नाही. कारण रुग्णांसाठी ही सेवा अत्यंत महत्त्वाची सेवा आहे असे यावेळी आमदार प्रताप अडसड यांनी संबंधितांना सुचविले. एकुण आठ रुग्णवाहिका रुग्णांच्या सेवेकरिता उपलब्ध करून दिल्या, त्यापैकी एक रुग्णवाहिका ही चांदूर रेल्वे ग्रामीण रुग्णालयकरिता तर आमला विश्वेश्वर, पळसखेड येथील प्राथमिक आरोग्य केंद्राकरिता प्रत्येकी एक रुग्णवाहिका देण्यात येणार आहे. या व्यतिरिक्त धामणगाव तालुक्यातील तळेगाव दशासर, मंगरूळ दस्तगीर व अंजनसिंगी येथील प्राथमिक आरोग्य केंद्राकरिता प्रत्येकी एक व नांदगाव खंडेश्वर तालुक्यातील सातरगाव आणि धामक येथे प्रत्येकी एक रुग्णवाहिका देण्यात येणार आहे. येणाऱ्या काळात मतदार संघातील लोणी, पापड,आणि वाढोणा या गावात सुद्धा रुग्णवाहिका उपलब्ध करून देण्यात येणार आहे असा मानस सुद्धा आमदार प्रताप अडसड यांनी या प्रसंगी व्यक्त केला. सदर कार्यक्रमाचे संचालन अजय हजारे यांनी तर आभार प्राविण्य देशमुख यांनी मानले. यावेळी अनेक नागरिक उपस्थित होते.

# माती, मुरुमाचे उत्खनन, शेतकऱ्यांचे नुकसान

**निरसाणा येथील प्रकार**



**महासागर प्रतिनिधी**

**नांदगाव खंडेश्वर, ( दि.12 )** - नांदगाव खंडेश्वर तालुक्यातील निरसाणा येथील गोयल नामक व्यक्तीने आपल्या शेतातील माती मुरूम काढून नेल्याने त्या शेतात तलावाचे स्वरूप प्राप्त झाले आहे. गेल्या दोन वर्षापासून गोयल यांनी हजारो ट्रक माती, मुरूम काढून नेल्याने आजूबाजूच्या गरीब शेतकऱ्यांची शेत जमीन चे मोठ्या प्रमाणात नुकसान झाले आहे. त्यामुळे संतप्त शेतकऱ्यांनी तहसिल कार्यालयावर धडक देत, एका निवेदनातून गोयलवर कारवाई करण्याची मागणी केली.

शेतकऱ्यांनी निवेदनात सांगितले की, गोयल यांचा अंजनगाव बारी परिसरातील कोंडेश्वर येथे वीटभट्टीचा व्यवसाय आहे. त्यांनी आपल्या व्यवसायाकरिता शेतापासून साधारणपणे 15 ते 18 किलोमीटर अंतरावरील मोठ्या ट्रकने माती वाहतूक केल्याने निरसना ते मांजरी मसला व निरसना ते आडगाव बुद्रुक रस्ते सुद्धा खराब झाले आहे. गोयल यांच्या शेतात तलावाचे स्वरूप निर्माण असल्याने आजूबाजूच्या शेतकऱ्यांची जमीन पडीत आहे. आजूबाजूच्या शेतकऱ्यांना रब्बी पिकाकरिता जमीन तयार करता येत नाही. त्यामुळे शेतकरी चिंतातूर झाले आहे. वरील बाबतीत गावातील एका शेतकऱ्यांच्या शिष्टमंडळाने नांदगाव खंडेश्वर चे प्रभारी तहसीलदार संजय भास्कर यांची भेट घेऊन वरील बाबतीत चे निवेदन सादर केले. शेतकऱ्यांनी हा प्रकार तातडीने थांबवावा व शेतकऱ्यांना नुकसान भरपाई द्यावी अशी मागणी केली. हा प्रकार न थांबल्यास आंदोलनाचा इशारा या शेतकऱ्याच्या शिष्टमंडळने दिला आहे. या शेतकऱ्यांच्या शिष्टमंडळामध्ये गावाचे माजी सरपंच प्रवीण भेंडे, रोशन आमले, मयूर उगले, शुभम आमले, नितीन भेंडे, अनिकेत ठाकरे यांच्यासह नुस्कानग्रस्त शेतकऱ्यांचा सहभाग होता.

# गौ-सेवेचे कार्य सदैव प्रेरणादायी-आ.खोडके

**गौरक्षण संस्थेच्या वतीने सत्कार नवनिर्वाचित आ. सुलभा खोडकेंचा सत्कार**

**महासागर प्रतिनिधी**

**अमरावती,( दि.12 )** - गौ मातेची उत्पत्ति आदि कालात समुद्र मंथनाने झाली. गौमातेला कामधेनू म्हणून संबोधले जाते. 135 वर्षापासून श्री.गौरक्षण संस्था येथे गौ सेवा होत आहे. गौसेवा ही सर्वोत्तम सेवा म्हणून ओळखल्या जाते. गौमातेची सेवा करण्याची संधी मला लाभली त्याबद्दल मी गौरक्षण संस्थेच्या सर्व मान्यवरांचे प्रति कृतज्ञता व्यक्त करीत आभार मानते. यासोबतच तुलादान, गौ पूजन कार्यक्रम आयोजित करण्यात आला या गौरवशाली क्षणी माझा सहभाग हा एक हर्षदायी क्षण आहे. असे प्रतिपादन आमदार सुलभा संजय खोडके यांनी उपस्थितांना संबोधून केले.



मंगळवार (दि.10 डिसेंबर) गौरक्षण संस्था येथे आयोजित कार्यक्रमात त्या बोलत होत्या. मंगळवारी सायंकाळी स्थानिक परिसरात आमदार सुलभा खोडके यांच्या हस्ते गौमातेचे पूजन करण्यात आले. सर्वप्रथम आमदार खोडके व राष्ट्रवादी काँग्रेस पक्षाचे प्रदेश उपाध्यक्ष संजय खोडके यांच्या हस्ते द्वारकाधीश भगवान श्रीकृष्ण प्रतिमेचे विधिवत पूजन करण्यात आले. तदनंतर गौरक्षण संस्थेच्या वतीने अध्यक्ष ?ड.आर.बी.अटल व अन्य पदाधिकाऱ्यांच्या हस्ते अमरावती विधानसभा मतदारसंघात दुसऱ्यांदा विजय संपादन केल्याबद्दल आमदार सुलभा खोडके यांचा पुष्पगुच्छ देऊन सत्कार करण्यात आला. जगदीश अग्रवाल, अनील गोयनका, दीपक मंत्री, महेंद्र भुतडा, वसंत कलंत्री, श्रीनिवास लढ्ढा, डॉ.महेश हेडा, मनोहर मालपाणी, श्रीकांत झंवर, मधुसूदन करवा, गिरीश करवा, मनोज केवले, संजय अटल, मनीष करवा, अजय दातेराव, लक्ष्मीकांत खंडेलवाल, चंदा काकाणी, प्रकाश काकाणी, प्रकाश राठी, प्रकल्प राठी, श्याम हेडा, विनय चांडक, संदीप ढोबळे, श्याम भय्या, सुनील लढ्ढा, संजय ककरानिया, ओमप्रकाश लढ्ढा, राजेंद्र दरणे, संजय सेंगर, गोपाल मंजलवार, अशोक हेडा, प्रदीप मिश्रा, अशोक हजारे, निलेश शर्मा, अजय हेडा आदींसह अन्य मान्यवर उपस्थित होते.

## जाहीर सुचना

माझे अशील श्री. श्रद्धानंद मधीराम चावला यांची खालील मिळकतीचे मुळ खरेदी खत दि. १६/०८/१९७६ र.द.क्र. १७५५ हे गहाळ झाले असून कोणास या बाबत माहिती असल्यास किंवा कोणास सापडली असल्या किंवा कुठे गहाण असल्यास त्यांनी खालील पत्यावर कळविणे किंवा आणुन देणे.

याद्वारे सर्वास कळविण्यात येते की, या मिळकती बाबत वरील दस्ताऐवज ला घेऊन कोणतेही व्यवहार करू नये व केल्यास माझे अशील होणाऱ्या नुकसानास जबाबदार राहणार नाही व त्यांच्यावर कुठलही बंधन राहणार नाही.

वरील मिळकती खरेदी संदर्भात कुठलीही आक्षेप/माहिती ७ दिवसात प्राप्त झाली नाही तर माझे अशील सदर मिळकतीचे दस्त गहाळ झाले असे समजून पुढिल कार्यवाही करतील याची नोंद घ्यावी.

मिळकतीचे वर्णन

सदर मिळकत ही म.न.पा. अमरावती व दु.नि. अमरावती यांच्या अधिकारा खालील येत असून, याचा शे.स.क्र. ३९ पैकी, प्लॉट क्र. ०६ चौ.मी (३२४० चौ.फूट) मौजे पेठ अमरावती प्रगणे बडनेरा ता. अमरावती जि. अमरावती याची चर्तु:सिमा खालील प्रमाणे आहे.

पुर्वेस :- प्लॉट क्र. ३ पश्चिमेस प्लॉट क्र. ७

उत्तरेस :- रोड दक्षिणेस :- गल्ली

शिक्का

**पत्त :- ॲड. वैभव न. काकिर्डे ॲन्ड, १९, हरिओम कॉलनी, संताजी नगर, अमरावती**

## जाहीर नोटीस

या जाहीर नोटीस द्वारे सर्वत्र लोकांना कळविण्यात येते की, अर्जदार राधिका दिपक कोगदे लग्नापूर्वीचे नाव राधिका दामोधर अघडते रा. विहिगांव ता. अंजनगांव सुर्जी जि. अमरावती येथील रहीवाशी आहेत. त्यांच्या स्वत:चे जन्माची नोंद ग्रा.प. कार्यालय गावंडगांव बु. येथे रजिस्टरमध्ये जन्माची नोंद नसल्याने त्यांनी जन्म/मृत्यू अधिनियम १९६९ चे कलम १३ (३) अन्वये जन्माच्या नोंदीचे आदेश होण्याबाबतचा विनंती अर्ज या कार्यालयात दि. २६/०९/२०२४ रोजी सादर केला आहे.

त्यामुळे अर्जदारांनी दिलेल्या अर्जावरून जाहीरनामा प्रसद्धि करण्यात येत आहे. राधिका दामोधर अघडते यांचा जन्म गावंडगांव बु. येथे दि. ३१/०३/१९८५ रोजी झाला आहे. त्याबाबत कोणाची हरकत किंवा आक्षेप अथवा तक्रार असल्यास किंवा प्रकरणात काही म्हणावयाचे असल्यास त्यांनी सदर जाहीरनामा प्रसिद्ध झाल्यापासून ३० दिवसाचे आत स्वत: अथवा आपल्या अधिवक्ता मार्फत लेखी म्हणने सादर करावेत. अन्यथा ३० दिवसानंतर जर कोणाची हरकत किंवा आक्षेप अथवा तक्रार प्राप्त झाल्यास त्यांचा विचार करण्यात येणार नाही याची नोंद घ्यावी.

शिक्का

**नायब तहसीलदार महसूल**
**अंजनगांव सुर्जी**

## जाहीर नोटीस

या जाहीर नोटीस द्वारे सर्वत्र लोकांना कळविण्यात येते की, अर्जदार राजेश किसन अस्वार रा. अंजनगाव ता. अंजनगांव सुर्जी जि. अमरावती येथील रहीवाशी आहेत. त्यांच्या स्वत:च्या जन्माची नोंद न.प. अंजनगांव येथे रजिस्टरमध्ये नसल्याने त्यांनी जन्म/मृत्यू अधिनियम १९६९ चे कलम १३ (३) अन्वये जन्माच्या नोंदीचे आदेश होण्याबाबतचा विनंती अर्ज या कार्यालयात दि. २२/११/२०२४ रोजी सादर केला आहे.

त्यामुळे अर्जदारांनी दिलेल्या अर्जावरून जाहीरनामा प्रसद्धि करण्यात येत आहे. राजेश किसन अस्ववार यांचा जन्म अंजनगाव येथे दि. १५/०७/१९७८ रोजी झाला आहे. त्याबाबत कोणाची हरकत किंवा आक्षेप अथवा तक्रार असल्यास किंवा प्रकरणात काही म्हणावयाचे असल्यास त्यांनी सदर जाहीरनामा प्रसिद्ध झाल्यापासून ३० दिवसाचे आत स्वत: अथवा आपल्या अधिवक्ता मार्फत लेखी म्हणने सादर करावेत. अन्यथा ३० दिवसानंतर जर कोणाची हरकत किंवा आक्षेप अथवा तक्रार प्राप्त झाल्यास त्यांचा विचार करण्यात येणार नाही याची नोंद घ्यावी.

शिक्का

**( रविंद्र काळे )**
**निवासी नायब तहसीलदार**
**अंजनगांव सुर्जी**